सार्वजनिक यंत्रणा उत्तरदायी करण्यासाठी उचललेले एक ठोस पाऊल...

सोशल ऑडिट

सार्वजनिक सेवांची अंमलबजावणी शासकीय यंत्रणा करते पण यंत्रणेकडून ही जबाबदारी योग्य रितीने पार पाडली जाते की नाही यावर देखरेख कुणी करायची? का आणि कशी करायची? या प्रश्नांची उत्तरे अगदी स्पष्ट आहेत. जे लोक या सेवा घेतात त्यांनीच सेवांच्या देखरेखीची जबाबदारीही घेतली पाहिजे, तरच त्यांना सेवेचा योग्य प्रकारे लाभ मिळेल आणि सेवेचा दर्जाही टिकून राहील. हे मान्य असलेल्या काही जणांनी देखरेख कशी करायची याचे उत्तरही शोधले आणि सार्वजनिक सेवांच्या देखरेखीसाठी सोशल ऑडिटची पद्धत वापरण्याचे ठरवले. प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्रातल्या बीड, गडचिरोली, आणि सोलापूर या जिल्ह्यांच्या तीन तालुक्यांमधील ३० गावात 'सार्वजनिक सेवांचे सोशल ऑडिट'करण्यात आले. 'गावगटां'च्या या पुढाकाराला स्वयंसेवी संस्थांची साथ होती. गावगटांनी स्थानिक गरजांप्रमाणे सेवांची निवड करून ऑडिटचा एक टप्पा पूर्ण केला. या अनुभवातून त्यांच्या लक्षात आले की जेव्हा पूर्ण माहितीनिशी, नेमकेपणाने आणि सामूहिकपणे प्रश्न विचारू लागले, तेव्हा यंत्रणाही उत्तरदायी होऊ लागली, परिणामी सेवांचा दर्जा सुधारू लागला.

पार्श्वभूमी

'लोकाधारित देखरेख व नियोजन' ही संकल्पना महाराष्ट्रासाठी नवी नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत (NHM) सरकारी आरोग्य सेवांच्या देखरेखीसाठी ही पद्धती प्रथम अवलंबली. महाराष्ट्रात या कामाची सुरुवात २००७ पासून झाली. आरोग्य सेवांविषयी लोकांच्या ज्या तक्रारी असतील त्या मांडण्यासाठी एक जागा आणि त्या तक्रारी दूर करण्याची लोकाभिमुख पद्धती यातून तयार करण्यात आली. आरोग्य सेवांचा दर्जा

उंचावण्यामध्ये आणि गरजूंसहित अधिकाधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचण्यासाठी या प्रक्रियेने हातभार लावलेला आहे.

या कामात साथी (SATHI) संस्थेने राज्य समन्वयक संस्था म्हणून जबाबदारी घेतली असून जिल्ह्यातील कामांची जबाबदारी स्वतंत्र जिल्हा समन्वय संस्थांवर आहे. आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेखीच्या दहा वर्षांच्या अनुभवानंतर ही प्रक्रिया पुढील टप्प्यावर नेण्याची गरज भासली. त्यासाठी आणि आरोग्य सेवांप्रमाणेच इतर सरकारी सेवांवरील देखरेखीसाठी सोशल ऑडिटचा उपयोग कसा करता येईल हे तपासण्यासाठी 'सार्वजनिक सेवांचे सोशल ऑडिट' सुरू करण्यात आले. मेघालय राज्याचा याविषयीचा अनुभव उल्लेखनीय आहे. या राज्याने २०१७ मध्ये 'कम्युनिटी पार्टिसिपेशन अँड पब्लिक सर्व्हिसेस सोशल ऑडिट कायदा' करून १० विभागांच्या २६ सामाजिक सेवा/योजनांवर एकाच वेळी सोशल ऑडिट करण्याची सुरुवात केली. मेघालयचा यशस्वी अनुभव डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रातील सोशल ऑडिटच्या प्रक्रियेची आखणी करण्यात आली.

संकल्पना

'सोशल ऑडिट' म्हणजे काय?

सरकारमार्फत पुरविल्या जाणाऱ्या योजना लोकांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचल्या की नाही याची पडताळणी लोकांच्या सहभागाने करणे म्हणजे 'सोशल ऑडिट' होय.

रोजगार हमी कायद्यामुळे लोकांना 'सोशल ऑडिट'ची ओळख झालेली आहे. यामध्ये योजनेच्या अंमलबजावणीची माहिती शासकीय यंत्रणेकडून मिळवून ती प्रत्यक्ष लाभार्थ्यांना भेटून पडताळून पाहिली जाते आणि त्रुटी निदर्शनास आणून दिल्या जातात. शासकीय माहितीच्या आधारेच निष्कर्ष काढले जात असल्याने ते नाकारता येत नाहीत आणि त्रुटी दूर करणे जरूरीचे ठरते.

सार्वजनिक सेवांचे सोशल ऑडिट म्हणजे काय?

केवळ आरोग्य सेवांपुरती लोकाधारित देखरेख सीमित न ठेवता शिक्षण, पोषण, रोजगार, पाणी, स्वच्छता, शेती या व अशा विविध सामाजिक क्षेत्रांचाही त्यात समावेश करणे म्हणजे सार्वजनिक सेवांचे सोशल ऑडिट करणे.

आज अनेक राज्यांतून विविध प्रकारे 'सोशल ऑडिट'चा अवलंब केला जात आहे. रोजगार हमी कायद्याप्रमाणेच सर्व शासकीय योजनांमध्ये सोशल ऑडिटचा अंतर्भाव असला पाहिजे हे शासनाने तत्त्वतः मान्य केले आहे. सध्या भारतामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, प्रधानमंत्री घरकुल योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, स्वच्छ भारत अभियान, पेसा निधी, १४वा वित्त आयोग निधी इत्यादी योजना/कायद्यांमध्ये सोशल ऑडिटचा अंतर्भाव आहे. आत्तापर्यंतचा अनुभव पाहता, ही प्रक्रिया शासकीय यंत्रणेचे उत्तरदायित्व वाढवणारी; सरकारी यंत्रणा अधिक पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्तीकडे नेणारी; लोकांना प्रश्न विचारण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारी ठरलेली आहे. या सर्व अनुभवांच्या आधारे विविध सार्वजनिक सेवांवर एकत्रित पद्धतीने देखरेखीसाठी सोशल ऑडिटची प्रक्रिया करण्यात आली.

यामध्ये एकाच सेवेवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी लोकांच्या जगण्याशी संबंधित आवश्यक सेवांचा समावेश केल्याने हे काम लोकांना अधिक आपलेसे वाटले. त्यांचा सहभाग वाढला. स्थानिक कर्मचारी आणि संबंधित यंत्रणेचे उत्तरदायित्व वाढवणे असा सोशल ऑडिट प्रक्रियेचा हेतू राहिला.

महाराष्ट्रातील बीड (ता. अंबेजोगाई), सोलापूर (ता. सांगोला) आणि गडचिरोली (ता. कुरखेडा) या तीन जिल्ह्यातील तीस गावांमध्ये सार्वजनिक सेवांचे सोशल ऑडिट प्रायोगिक तत्त्वांवर करण्यात आले. जिल्ह्यातील संस्थांच्या सहभागाने आणि गावांमधील गावगटांच्या पुढाकाराने करण्यात आलेल्या या प्रक्रियेचे टप्पे, अनुभव, परिणाम व विश्लेषण पुढे मांडत आहोत .

असे केले सोशल ऑडिट

टप्पा १ : गावगट - बांधणी आणि सक्षमीकरण

अ) गावगट बांधणी

सर्वात पहिला टप्पा म्हणजे ज्या गावात सोशल ऑडिट करायचे तिथे गावगट उभा करणे. गट बांधणीची प्रक्रिया गावानुसार वेगवेगळी असू शकते. मात्र गट कसा असावा, त्यात कोण असावे याबाबतचे काही निकष तीस गावांतील कामाच्या अनुभवातून निदर्शनास आले. गट सर्वसमावेशक असला पाहिजे. तसेच त्यामध्ये समान सामाजिक हितसंबंध असलेल्या व्यक्तींचा, म्हणजे एखाद्या योजनेचे लाभधारक, वंचित समुदायातील व्यक्ती इत्यादींचा सहभाग असला पाहिजे.

गट सर्वसमावेशक करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. बहुतेक वेळेला ज्यांच्यासाठी सामाजिक योजना आखल्या जातात त्यांनाच या योजनांची माहिती नसते, कोणत्याही प्रकारच्या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याची त्यांच्याकडे फुरसत नसते. अशा व्यक्ती/गटांना भेटून त्यांना योजना समजावून देऊन त्यांचा सहभाग मिळवता येतो, असा संस्थांचा अनुभव राहिला.

एक-दोन बैठकांमध्ये गावगट तयार होत नाहीत. सहभागी संस्थांनी नियमित बैठका घेऊन, सोशल ऑडिटची संकल्पना समजावून देत गावगट बांधणीला चालना दिली. यादरम्यान लोकांशी स्थानिक प्रश्नांवर चर्चा केली, त्यातील काही प्रश्न लोकांच्या सहभागाने मार्गी लावले, ज्यामुळे गावगटातील सदस्यांचा उत्साह आणि आत्मविश्वास वाढला.

गावगट सदस्य

कोण असावेत?-

- सामाजिक कामाची आवड व वेळ देण्याची तयारी असलेले गावकरी
- पुरुष, महिला आणि वंचित-अल्पसंख्य समुदायांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा.
- ज्यांना शासकीय यंत्रणा कशा प्रकारे काम करते याची माहिती आहे अशा व्यक्ती; यामध्ये सरकारी सेवेतून निवृत्त झालेल्या व्यक्ती असतील किंवा सध्या सरकारी सेवेत असलेल्या पण संबंधित गावात कर्मचारी नसलेल्या व्यक्तीही असू शकतात.
- स्थानिक युवक मंडळे, महिला मंडळे/बचत गट यांच्याशी चर्चा करून युवक व महिलांचा सहभाग घेता येतो.

कोण नसावे?

- शक्यतोवर लोकप्रतिनिधी आणि स्थानिक शासकीय कर्मचारी यांचा गावगटात समावेश नसावा.

> ***ग्रामपंचायतीच्या समित्या कागदावर राहतात कारण त्या राजकारणाने प्रेरित असतात. खऱ्या प्रश्नांची दखल तिथं घेतली जात नाही. अशा गोष्टी 'गावगटात' होत नाहीत.***
>
> ***- सुगाव, गावगट सदस्य.***

ब) सोशल ऑडिट करण्यासाठी गावातील समस्यांची / योजनांची निवड

गट उभारणीनंतरची पायरी म्हणजे ज्या योजनांचे सोशल ऑडिट करायचे त्यांची निवड. ज्या गावातील गावगटांनी गटचर्चेच्या माध्यमातून गावकऱ्यांचे प्रश्न समजून त्यांचा प्राधान्यक्रम ठरवला त्या ठिकाणी विविध विभागांच्या योजनांचा ऑडिटच्या प्रक्रियेत समावेश झाला असा अनुभव आहे.

गटचर्चेदरम्यान लोकांनी ज्या अनेक समस्या मांडल्या, त्यात ठळकपणे रोजगार, उपजीविकेच्या समस्या, शिक्षण यांचा समावेश होता. आरोग्यावर लोकाधारित देखरेखीचे काम करूनही आरोग्य समस्या वा आरोग्यविषयक योजनांचा उल्लेख लगेच आला नाही. आरोग्य हा लोकांच्या प्राधान्याचा विषय नाही हे यावरून पुन्हा लक्षात आले. लोकांच्या अपेक्षा आणि नेमक्या समस्या व संबंधित योजनांपर्यंत पोहोचण्यासाठी या चर्चांचा खूप उपयोग झाला. तसेच लोकांना सोशल ऑडिटची माहिती देण्यासाठी आणि गावगटाच्या पुढाकाराला सहमती मिळवण्यासाठीही त्याचा उपयोग झाला.

> ***एकापेक्षा अधिक विषयांवर काम केल्याने लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न घेता आले. आम्ही ठराविक विषय घेऊन लोकांकडे गेलो नाही, तर त्यांनी सांगितलेल्या प्रश्नांना हाती घेतले, त्यामुळे गावगटाच्या कामाची विश्वासार्हता वाढली.***
>
> ***- येल्डा, गावगट सदस्य.***

गावगटाने गटचर्चेतून समस्या जाणून घेतल्याने खालीलप्रमाणे विविध विभागांच्या समस्या पुढे आल्या-

कृषी व पशु संवर्धन विभाग	▪ कृषी सहाय्यकाने नियमित गावात येऊन योजनांची माहिती देणे. ▪ जनावरांच्या दवाखान्याचे वीज मिटर बदलून देणे.
सार्वजनिक शिक्षण विभाग	▪ शाळेतील वर्ग खोल्या, शौचालयातील दरवाजे, खिडक्यांची दुरुस्ती, पिण्याच्या व वापराच्या पाण्याची व्यवस्था, मुले-मुलींसाठी स्वतंत्र शौचालय व स्वच्छतागृहाची व्यवस्था करणे. ▪ सर्व शिक्षा अभियानातून शाळेला येणाऱ्या निधीत वाढ करणे व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण व नियमित बैठका घेणे.
एकात्मिक बाल विकास विभाग	▪ गावातील व दलित वस्तीतील अंगणवाडीसाठी स्वतंत्र इमारतीची व्यवस्था करणे. ▪ अंगणवाडीमधील इलेक्ट्रॉनिक काटा दुरुस्त करणे किंवा नवीन घेणे, प्रथमोपचार पेटी, शौचालय, धान्य ठेवण्यासाठी कोठ्या, स्वतंत्र स्वयंपाकगृह, गॅसची व्यवस्था करणे.
सार्वजनिक वितरण व्यवस्था	▪ रेशन दुकानातून वेळच्या वेळी रेशन व विधवा महिलांना अंत्योदय योजनेचा लाभ देणे.
सार्वजनिक आरोग्य विभाग	▪ ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या निधीचे नियोजन करणे. ▪ लाभापासून वंचित महिलांना जननी सुरक्षा योजना व प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा लाभ देणे. ▪ दारे खिडक्या, लाईट, रंगरंगोटी व उपकेंद्राच्या रस्त्याची दुरुस्ती इ. करून बंद असलेले आरोग्य उपकेंद्र चालू करणे व आरोग्य उपकेंद्र दररोज उघडणे. ▪ प्रा.आ.केंद्राचे निवासस्थान दुरुस्त करणे व कर्मचाऱ्यांना निवासाची सोय करणे. ▪ शिपायांची आणि औषध वितरकाची रिक्त पदे भरणे व रुग्णवाहिका दुरुस्त करणे. ▪ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आठवड्यातून कमीत कमी एकदा उपकेंद्राला भेट देणे.
ग्रामविकास विभाग	▪ गावातील गरजू व्यक्तींना घरकुल व शौचालय बांधून देणे. ▪ गावात कचराकुंडी बसवणे व गावात स्वच्छता मोहीम राबवणे. ▪ मागील चार वर्षांपासून ग्रामपंचायती अंतर्गत आलेल्या विविध योजनांच्या शिल्लक निधीचे ग्राम विकासासाठी नियोजन करणे. ▪ ग्रामसेवक गावात नियमित येणे.
आदिवासी विकास विभाग	▪ अमृत आहार योजने अंतर्गत मिळणाऱ्या रोजच्या आहारात भाजी-पोळी, डाळ-भात, अंडी आणि शेंगदाणा लाडू मिळण्यासाठी व आहार रोज मिळेल यासाठी पाठपुरावा करणे. ▪ पेसा अंतर्गत अमृत आहार योजनेचा आहार शिजविणाऱ्या स्वयंपाकी महिलेचे सहा महिन्यापासूनचे थकीत मानधन देणे. ▪ अमृत आहार योजनेच्या समितीबद्दल लाभार्थी व समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण देणे.

क) गावगट प्रशिक्षण

ज्या योजना गावगटाने निवडल्या आहेत त्याचे तपशील समजून घेणे आणि सोशल ऑडिट प्रक्रियेच्या पायऱ्या समजून घेणे हे गावगटाच्या प्रशिक्षणाचे उद्देश राहिले. काही संस्थांनी सर्व गावगट सदस्यांसाठी एकत्रित प्रशिक्षणे घेतली, तर काही संस्थेने प्रत्येक गावगटासाठी स्वतंत्र प्रशिक्षणे घेतली.

एकाच प्रशिक्षणातून सर्व विषय पोहोचवता येत नाहीत. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर याप्रमाणे दोन वा त्याहून अधिक प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणानंतरच्या कामात गावगटांना सहाय्य करून त्यांचे कामाचे मनोबल व क्षमता वाढवणे ही संस्थांची जबाबदारी होती. याकरिता संस्थांच्या क्षमता बांधणीसाठी स्वतंत्र प्रशिक्षणांचे आयोजन गरजेचे होते. संस्थांना आपली भूमिका नीटपणे पार पाडता यावी आणि गावगटांनी निवडलेल्या विषयांची त्यांनाही सखोल माहिती व्हावी यादृष्टीने या प्रशिक्षणांचे आयोजन केले.

प्रशिक्षणासंबंधी ठळक व महत्त्वाचे

- गावगटांनी सोशल ऑडिटसाठी निवडलेल्या प्रत्येक योजनेचा - त्यांचा हेतू, तरतुदी, जबाबदार यंत्रणा यांचा प्रशिक्षणात समावेश असला पाहिजे.
- सोशल ऑडिटच्या प्रत्येक टप्प्यानुसार प्रशिक्षणांची आखणी केली पाहिजे.
- प्रशिक्षणाला प्रात्यक्षिकांची, कृतीची जोड आवश्यक - जे शिकले ते करून पाहिले पाहिजे.
- सोशल ऑडिट संकल्पना, शासकीय योजना व लोकांचे अधिकार आदींबाबत माहितीपर पोस्टर्स, मोठे फ्लेक्स माहिती व वातावरणनिर्मितीसाठी उपयोगी पडतात.
- गावगटांना वापरता येईल असे प्रशिक्षण / संवाद साहित्य - माहिती पुस्तिका, माहिती संकलनाचे फॉरमॅट इत्यादी - उपयोगी ठरते.
- प्रशिक्षणानंतर गावात जाऊन काय करायचे या नियोजनाचाही प्रशिक्षणात समावेश पाहिजे.

टप्पा २ : सरकारी माहितीचे संकलन व विश्लेषण

अ) माहिती संकलन

सोशल ऑडिटच्या प्रक्रियेतील माहिती संकलन हा पहिला महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांच्याशी संबंधित माहिती मिळणे हा लोकांचा हक्क आहे. ही जाणीव लोकांना करून देण्यात आली. तसेच लोकांना माहिती देणे ही यंत्रणेची जबाबदारी आहे हेही त्यांच्यापर्यंत पोहोचवले. यासाठी गट विकास अधिकाऱ्यांना पत्राद्वारे सोशल ऑडिटची माहिती दिली आणि स्थानिक कर्मचाऱ्यांना माहिती देण्यासंबंधीच्या त्यांनी सूचना द्याव्यात ही विनंतीही करण्यात आली.

सोशल ऑडिटच्या प्रक्रियेत सरकारी यंत्रणेची मान्यता मिळवणे आणि सुरुवातीपासूनच त्यांची प्रक्रियेत सहभागिता आवश्यक असल्याचे या अनुभवातून लक्षात आले.

असे केले सरकारी माहितीचे संकलन

- ज्या योजनांचा ऑडिटमध्ये समावेश होणार होता त्यांची तपशीलवार माहिती घेण्यासाठी फॉरमॅट तयार करून गावगटांना देण्यात आले. योजनेच्या सर्व लाभार्थ्यांच्या यादीसह सर्व तपशील घेण्यात आले.
- शक्यतोवर गावगटांनी संबंधित कर्मचारी/ अधिकाऱ्यांकडून माहिती संकलित करावी असा प्रयत्न राहिला.
- सुरुवातीला स्थानिक कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली. जिथे गावगटांना अडचणी आल्या तिथे त्यांनी संस्थांची मदत घेतली.
- स्थानिक कर्मचाऱ्यांनी सुरुवातीला माहिती देण्याची टाळाटाळ केली, तेव्हा गावगटाने माहिती संकलनाचे कारण समजावून दिल्यावर सहकार्य मिळाले. माहिती मिळवण्यासाठी पाठपुरावा करावा लागला.
- सीबीएम प्रक्रियेचा अनुभव माहिती संकलनाला पूरक ठरला. कोणती माहिती कशा प्रकारे घ्यायची यावर प्रत्येक गावगटाने विचारपूर्वक मार्ग शोधला. सरकारी कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन केला.

“ गावपातळीवर सरकारी कर्मचाऱ्यांकडून माहिती घेताना त्यांच्या समस्याही विचारल्या, त्यामुळे त्यांनाही विश्वास वाटला. त्यांची तपासणी नसून गावाचे प्रश्न सुटावेत यावर गावगटाचा भर आहे हे कर्मचाऱ्यांना समजले.

- गावगट सदस्य, सुगाव.

माहिती संकलनाला गती देणारा अंबेजोगाईतील गावगटांचा तालुका समन्वयक गट :

मानवलोक संस्थेने अंबेजोगाई तालुक्यातील १० गावांमध्ये सोशल ऑडिटची सर्व प्रक्रिया पूर्णतः गावगटांच्या पुढाकाराने व्हावी याकरिता गावगटांचा एक तालुका समन्वयक गट तयार केला. या गटाच्या नावाने लेटरहेड तयार करण्यात आले. माहिती संकलन, जनसंवाद यासाठीचा तालुका अधिकाऱ्यांसोबतचा पत्रव्यवहार संपूर्णतः तालुका समन्वयक गटाने केला.

ब) माहितीचे विश्लेषण

माहिती संकलनानंतरची पायरी म्हणजे संकलित केलेली माहिती तपासणे आणि त्याचा अर्थ लावणे. आपल्याकडे कोणकोणती माहिती जमा झाली आहे, त्यातून काय लक्षात येते हे गावगटाला समजले पाहिजे. योजनेत प्रत्यक्षात असलेल्या तरतुदी आणि संकलित माहितीतून दिसणारे वास्तव यातील ठळक फरक लक्षात आला पाहिजे. तरच ही माहिती लोकांना समजेल अशा प्रकारे सांगणे त्यांना शक्य आहे.

माहिती विश्लेषणाचा उपयोग

- योजनेमधील तरतुदी आणि योजना राबवताना कर्मचाऱ्यांकडून ठेवले जाणारे रेकॉर्ड व योग्य लाभार्थी कोण या गोष्टी गावगटाला समजल्या.
- त्याआधारे, पुढच्या गाव जनजागृतीच्या टप्प्यातून ही माहिती लोकांना समजेल अशा भाषेत त्यांच्यापर्यंत नेणे शक्य झाले.

टप्पा ३ -

गाव जनजागृती आणि सरकारी माहितीची पडताळणी

सोशल ऑडिटच्या पडताळणीचा टप्पा खूप महत्त्वाचा आणि बरेच शिकवणारा होता. संकलित शासकीय माहितीतील त्रुटींबरोबरच इतरही अनेक महत्त्वाच्या समस्या या दरम्यान पुढे आल्या.

जगजागृती व पडताळणीच्या पद्धती

प्रत्यक्ष लाभार्थी भेट, शाळा वा आरोग्य केंद्र अशा सुविधांना प्रत्यक्ष भेट व चर्चा, मोठ्या गावबैठका, लहान गटांसोबतच्या बैठका, कोपरा बैठका आणि पोस्टर प्रदर्शने.

- पडताळणीमध्ये गावगटातील सदस्यांनी यादीप्रमाणे प्रत्येक लाभार्थ्याच्या घरी जाऊन सविस्तर माहिती घेतली. उदा. मातृत्व वंदना योजनेअंतर्गत लाभार्थी असेल तर प्रत्यक्षात किती हप्त्यांचे पैसे मिळाले, किती पैसे मिळाले हे तपासले. पासबुकाची नोंद पाहिली.
- शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रांची माहिती प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करून आणि तिथल्या लाभार्थ्यांशी बोलून पडताळून पाहिली. उदा. शिक्षकांशी बोलून रजिस्टरमधील नोंदी तपासल्या, स्वयंपाक घर, वर्गखोल्या, पाणी, शौचालय सुविधा पाहिल्या, मध्यान्ह भोजनाविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा केली इत्यादी.
- पडताळणीच्या वेळी वैयक्तिक लाभार्थ्यांकडून तर सहकार्य मिळालेच, पण शिक्षक, अंगणवाडी सेविका

इत्यादी कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले, कारण त्यांनाही त्यांच्या समस्या मांडायच्या होत्या. निधीचा अभाव, त्यांनी वारंवार मागण्या करूनही सुविधा न मिळणे याचा परिणाम त्यांच्या सेवांवर होत असल्याचे दिसून आले.

- पडताळणीच्या शेवटी शासकीय माहिती, पडताळणीतून दिसून आलेल्या तफावती, लाभार्थ्यांनी सांगितलेल्या अडचणी, नव्याने समोर आलेले मुद्दे यांची नोंद करून ठेवली.

- वरवर पाहता सुरळीत चाललेल्या सार्वजनिक योजनांच्या अंतरंगात किती समस्या आहेत हे पडताळणीच्या प्रक्रियेतून प्रकर्षाने पुढे आले.

पडताळणीचे महत्त्व: गावगटांच्या नजरेतून

"लाभार्थीला भेटून पडताळणी केल्याने योजनेतल्या अनेक त्रुटी समजल्या. अंमलबजावणीत काय काय सुधारणा व्हायला पाहिजेत हे लक्षात आले.

- आंधळी, गावगट सदस्य.

"जनसुनवाईपूर्वी लोकांमध्ये योजनांबाबतचा अवेअरनेस वाढवणेही आवश्यक आहे. मला योजनेचा लाभ कशा प्रकारे मिळायला पाहिजे होता व प्रत्यक्षात कसा मिळाला, यातला फरक त्यांना समजला की ते आपले प्रश्न मुद्देसूदपणे मांडतात. मग अधिकाऱ्यांनाही टाळाटाळ करता येत नाही.

- जुझारपूर, गावगट सदस्य.

"प्रत्यक्ष पडताळणी महत्त्वाची होती, त्यातून कितीतरी समस्या लक्षात आल्या. शाळेतील स्वच्छता, अपुरे पाणी इत्यादी. ग्रामपंचायतीच्या निधीतून त्यात सुधारणा करता आल्या.

- सुगाव, गावगट सदस्य.

माहिती संकलन व पडताळणीतून पुढे आलेले मुद्दे व त्याचे विश्लेषण

प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना			सर्व ३ हप्ते मिळाले		दोन हप्ते मिळाले		पहिला हप्ता मिळाला		लाभ मिळाला नाही	
जिल्हा	तालुका	वर्षातील लाभास पात्र एकूण गरोदर महिला	आरोग्य विभागाची माहिती	सोशल ऑडिट पडताळणी नुसार	आरोग्य विभागाची माहिती	सोशल ऑडिट पडताळणी नुसार	आरोग्य विभागाची माहिती	सोशल ऑडिट पडताळणी नुसार	आरोग्य विभागाची माहिती	सोशल ऑडिट पडताळणी नुसार
गडचिरोली	कुरखेडा	५५	१२	७	३८	११	४८	१४	७	४१
बीड	अंबेजोगाई	९८	-	१३	-	२९	-	४०	-	५८
सोलापूर	सांगोला	११७	८७	१६	९८	२७	९९	३०	१८	८७
	एकूण	२७०	९९	३६	१३६	६७	१४७	८४	२५	१८६

प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेच्या गेल्या वर्षभरातील लाभास पात्र एकूण पहिल्या खेपेच्या तिन्ही जिल्ह्यातील गरोदर महिलांची संख्या २७० आहे. आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार २७० पैकी सर्व तीन हप्ते मिळालेल्या महिलांची संख्या ९९ आहे, दोन हप्ते मिळालेल्या महिलांची संख्या १३६ आणि एक हप्ता मिळालेल्या महिलांची संख्या १४७ आहे. तर प्रत्यक्ष पडताळणीमध्ये मात्र ही संख्या कमी आढळली असून अनुक्रमे ३६, ६७ आणि ८४ अशी आहे. पात्र असूनही लाभ न मिळालेल्या महिलांची संख्या २५ असल्याचे आरोग्य विभागाकडून समजले, पण प्रत्यक्षात ही संख्या १८५ म्हणजे सातपट जास्त आहे. त्यामुळे प्रत्यक्ष सरकारने जरी असे सांगितले असले की या योजनेचा लाभ त्वरित दिला गेला तरीही त्यात बरीच तफावत असल्याचे पडताळणीतून दिसून आले.

कुपोषण दूर करण्यासाठी आणलेली अमृत आहार योजना स्वतःच निधीअभावी कुपोषित

कुरखेडा आदिवासीबहुल तालुका असल्याने सर्वच गावांमध्ये अमृत आहार योजना राबवली जाते. आदिवासी विभाग आणि एकात्मिक बाल विकास योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना अंमलात येते. या योजनेची पडताळणी करत असताना त्यातल्या गंभीर त्रुटी लक्षात आल्या. सावरगाव फरी गावातील गरोदर महिलांशी बोलताना आहार पुरेसा दिला जात नसल्याचे समजले. अंगणवाडी सेविकेशी बोलल्यावर तिने सांगितले की तीन-तीन महिने योजनेचा निधी येत नाही. त्यामुळे तिला अधूनमधून आहार बंद ठेवण्यावाचून पर्याय नसतो. ही समस्या या गावापुरतीच नव्हती, तर पडताळणी झालेल्या प्रत्येक गावातून कधी एक दिवस तर कधी त्याहून अधिक काळ अमृत आहार बंद ठेवल्याचे आढळले. अशी परिस्थिती असल्याचे गावगटांनादेखील माहिती नव्हते. जेव्हा सर्वच गावातून ही समस्या पुढे आली तेव्हा तिचे गांभीर्य त्यांनाही समजले. निधीची अडचण दूर व्हावी याकरिता तालुका पातळीवरच्या जनसुनवाईमध्ये हा प्रश्न मांडण्याचे गावगटाने ठरवले.

सुगावमध्ये निधीचा नव्हे तर नियोजनाचा अभाव

एकूण २८०० लोकसंख्येचे आणि हिंदू-मुस्लिम संमिश्र वस्तीचे अंबेजोगाई तालुक्यातील सुगाव. गावात जिल्हा परिषदेच्या दोन शाळा आहेत - एक मराठी माध्यमाची आणि एक उर्दू माध्यमाची. तीन अंगणवाड्या आहेत. एक सुसज्ज उपकेंद्र आहे. या तिन्ही सेवांच्या माहितीसह १४व्या वित्त आयोगाच्या निधीची माहिती गावगटाने ग्रामपंचायतीकडून मिळवली होती. पडताळणीची सुरुवात उर्दू माध्यमाच्या जिल्हा परिषद शाळेपासून झाली. फॉरमॅटनुसार एकेका मुद्द्याची माहिती घेत असताना मुख्याध्यापकांनी त्यांच्या समस्यांची भर घातली. पायाभूत सुविधांबाबत शाळेत बऱ्याच समस्या आहेत. शाळेच्या समोर मोकळी जागा आहे तिचा मैदान म्हणून वापर होतो, पण त्याला कुंपण नाही, त्यामुळे सर्व लहान-मोठ्या वाहनांचा शिरकाव या जागेत होत असतो. एकूण आठवीपर्यंत वर्ग आहेत, पण वर्गखोल्यांची संख्या कमी आहे. कारण दोन वर्गखोल्यांचे बांधकाम २०१२ पासून अर्धवट रखडलेले आहे. पाण्याची सुविधा नाही. मराठी माध्यमाच्या शाळेची इमारत नादुरुस्त आहे. इथेही पाण्याची सोय नाही. शौचालय बंद पडलेले आहे. दोन्हीकडच्या मुख्याध्यापकांनी सांगितले की त्यांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार मागणी करूनही कामे होत नाहीत. पडताळणी गटाने ग्रामसेवकाकडून माहिती घेतली, तेव्हा ग्रामपंचायतीच्या खात्यावर २७ लाख रुपये शिल्लक आहे. तरीही शाळांच्या मागण्यांचा विचार का केला गेला नाही, या प्रश्नाला ग्रामसेवकाकडे उत्तर नव्हते. निधीचा नव्हे तर नियोजनाचा अभाव आहे ही गोष्ट पडताळणीतून स्पष्ट झाली.

काही वेळा माहिती संकलना दरम्यानतर काही वेळा पडताळणी दरम्यान प्रश्न सुटू लागलेत.

अंबेजोगाईच्या पठाणमांडवा गावामध्ये गावगटाने रेशनच्या प्रश्नाची माहिती घेऊन ऑडिट करायचे ठरवले. गावातला रेशन दुकानदार नागरिकांना त्यांच्या वाट्याचे ५०% धान्य द्यायचा आणि पावती १००%ची करायचा. ग्राहकांना पावती द्यायचाच नाही. गावगटातील एका सदस्याने रेशन घेतल्यावर पावतीची मागणी केली. दुकानदार टाळाटाळ करू लागला. ज्यांनी त्याला जाब विचारला तेव्हा "तुम्हाला तुमचे रेशन देतो" असे म्हणत त्यांना आपल्या बाजूला वळवायचा प्रयत्न केला. ऑनलाईन व ऑफलाईन कार्डधारकांना वेगवेगळ्या प्रकारे माल दिला जात होता. पावती दिली जात नव्हती. या समस्यांची तक्रार गावगटाने तहसीलदाराकडे केली. संबंधित अधिकारी गावात आले तेव्हा समन्वय गटाने बरेच लोक जमवले. लोकांच्या प्रश्नांना अधिकारी नीट उत्तरे देत नव्हते. काहींनी मोबाईल कॅमेरे सुरू केले. त्यामुळे पुढे हा प्रश्न मार्गी लागला. सर्वांना १००% माल मिळणार व दिलेल्या मालाची पावती मिळणार हे दुकानदाराने कबूल केले. या गावात रेशनची परिस्थिती सुधारली आहे अशी बातमी जवळपासच्या गावांमध्येही पोहोचली. रेशनचा प्रश्न प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा असल्याने तुम्ही हे कसे केले हे पंचक्रोशीतील लोक गावगटातील लोकांना विचारू लागले.

टप्पा ४ : जनसुनवाई व पाठपुरावा

अ) जनसुनवाई पूर्वतयारी

इतर टप्प्यांप्रमाणे जनसुनवाईच्या पूर्वतयारीचा टप्पाही महत्त्वाचा आहे. यात एकाच वेळी अनेक पातळ्यांवर काम केले गेले. लोकसहभाग वाढवण्यासाठी गावात जाणीवजागृती व प्रचार करण्यात आला, संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित राहतील यासाठी पाठपुरावा करण्यात आला आणि प्रत्यक्ष जनसुनवाईच्या वेळी सादर करायची माहिती व अहवाल तयार करण्यात आले.

- सोशल ऑडिटची व जनसुनवाईची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करण्यात आला - कला पथक, पोस्टर प्रदर्शने, पत्रकांचे वितरण इत्यादी.
- संबंधित विभागांचे शासकीय अधिकारी येतील याची खबरदारी घेतली गेली. अंबेजोगाईमध्ये तालुका समन्वयक गटाने अधिकाऱ्यांना पत्र पाठवले, तसेच प्रत्येक गावच्या सरपंचांनीही संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना जनसंवादात सहभागी होण्यासाठीचे पत्र पाठवले आणि फोनवरून वैयक्तिक पाठपुरावाही केला.
- सर्व समाजाचे लोक, सर्व वयाचे लोक, महिला-पुरुष सहभागी होतील आणि कार्यक्रम सर्वसमावेशक होईल असा प्रयत्न केला.
- सोशल ऑडिटपूर्वी आणि नंतर वर्तमानपत्रात बातम्या दिल्या, ज्यामुळे जवळपासच्या गावांनाही याची माहिती झाली.
- सोशल ऑडिटच्या प्रक्रियेतील निष्कर्षांचा अहवाल तयार करण्यात आला. त्याआधारे शासकीय माहिती व पडताळणीतून मिळालेली माहिती यांच्यातील तफावत दर्शवणारा व गावगटाच्या मागण्यांची मांडणी करणारा फलक कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी तयार करण्यात आला.

ब) जनसुनवाई

गावातील समस्या व त्याविषयीच्या मागण्या यांचा माहितीफलक कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आला.

- राज्यघटना, नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये यांची माहिती देण्यात आली.
- सर्वसहमती, सामंजस्याचे वातावरण राहिले पाहिजे याची खबरदारी घेतली.
- अनेक लोकांना त्यांचे प्रश्न मांडता आले, समस्या कुठे मांडायच्या हीच समस्या आहे, काहींनी आपला रोष व्यक्त केला. प्रत्येक गावातील सोशल ऑडिट प्रक्रियेचा व जनसुनवाईचा अहवाल तयार करण्यात आला.
- जनसुनवाईला संबंधित सरकारी अधिकारी उपस्थित असायला हवेत. पण सगळीकडेच अधिकारी आले असे नाही. मात्र जिथे माहिती संकलनापासूनच सरकारी अधिकाऱ्यांशी संपर्क प्रस्थापित केला होता तिथे त्यांचा सहभाग मिळाला. जिथे योजनेच्या अंमलबजावणीत खूप त्रुटी होत्या, सरकारी अधिकाऱ्यांकडे लोकांच्या प्रश्नांना उत्तरे नव्हती तिथे त्यांनी जनसुनवाईला यायचे साफ टाळले.

- पाठपुराव्याचे नियोजन करण्यात आले. स्थानिक स्तरावर सुटणारे मुद्दे आणि वरच्या पातळीवर पाठपुराव्याचे मुद्दे अशी दोन प्रकारे विभागणी करून जबाबदारी व कृतीचा कालावधी ठरवण्यात आला.

जनसुनवाईचे महत्त्व: सहभागी लोकांच्या नजरेतून...

> ***"जनसुनवाईमध्ये गावकऱ्यांना आपल्या समस्या थेट अधिकाऱ्यांसमोर मांडता येतात. आपल्या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडून लगेच मिळते. खरं तर ग्रामसभेतही असंच व्हायला हवं आहे, पण तसं होत नाही.***
>
> ***- कुंभेफळ गावगट सदस्य.***

क) पाठपुरावा

जनसुनवाईत ठरलेल्या निर्णयांचा गावपातळीवरील पाठपुरावा मुख्यत्वे गावगटांनी केला. तर त्यावरील स्तरावर पाठपुरावा करण्यासाठी विविध मार्ग शोधण्यात आले. बीड जिल्ह्यात तालुका समन्वयक गटाच्या माध्यमातून गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी पाठपुरावा करण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यात तालुका समन्वयक गट उभा राहू शकला नाही. मात्र इथे 'एकता आरोग्य देखरेख महासमिती कुरखेडा' या नावाने गावपातळीवरील सीबीएम समित्यांचे तालुका फेडरेशन उभारले जात आहे. या फेडरेशनच्या माध्यमातून जनसुनवाईच्या मुद्द्यांचा पाठपुरावा करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यात संस्था व गावगट सदस्य यांनी मिळून पाठपुराव्याचे काम केले.

ड) तालुका जनसुनवाई

स्थानिक पातळीवर व पाठपुराव्यातून न सुटलेल्या मुद्द्यांचा समावेश करून सर्व गावांच्या सहभागाने तालुका जनसुनवाईचे आयोजन करण्यात आले.

- या जनसुनवाई निमित्ताने पूर्व सोशल ऑडिट प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला.
- आलेल्या एकूण समस्या आणि माहिती संकलन, पडताळणी, गाव जनसुनवाई, पाठपुरावा या प्रत्येक टप्प्यावर सुटलेल्या समस्यांचा व न सुटलेल्या मुद्द्यांचा एकत्रित आढावा घेण्यात आला. न सुटलेल्या मुद्द्यांबाबतच्या मागण्या सादर झाल्या व त्यावर उपस्थित सरकारी अधिकाऱ्यांनी आपली बाजू मांडली.

जनसुनवाईच्या निर्णयांचा पाठपुरावा

कृषी विभाग व पशु संवर्धन विभाग	सार्वजनिक शिक्षण विभाग	एकात्मिक बाल विकास विभाग
▪ कृषी साहाय्यक गावात येत नाही. योजनांची माहिती सांगत नाही. ▪ जनावरांच्या दवाखान्याचे वीज मीटर बदलून घेण्यात	▪ शाळेतील वर्गखोल्या, शौचालयातील दरवाजे, खिडक्या इ. दुरुस्तीची गरज आहे. ▪ शाळेतील मुले-मुली यांच्यासाठी स्वतंत्र शौचालय व स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. ▪ शाळेत शौचालयात पाण्याची व्यवस्था नाही. तसेच पिण्याच्या पाण्याची देखील व्यवस्था नाही. ▪ सर्व शिक्षा अभियानातून शाळेला निधी फार कमी येतो. ▪ शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या	▪ अंगणवाडीला स्वतंत्र इमारत नाही. ▪ अंगणवाडीमधील इलेक्ट्रॉनिक काटा बंद आहे, प्रथमोपचार पेटी, स्वतंत्र स्वयंपाकगृह व शौचालय व्यवस्था नाही. ▪ अंगणवाडीमध्ये रक्तवाढीची औषधे, व्हिटॅमिन-अ नाहीत, प्रथमोपचार पेटी, धान्य ठेवण्यासाठी कोठ्या, गॅस नाही. ▪ दलित वस्तीतील अंगणवाडीला स्वतःची इमारत नाही. ▪ गावातील अंगणवाडीच्या मुलांना

सार्वजनिक आरोग्य विभाग

- ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचा निधी खर्च झालेला नाही.
- काही महिलांना जननी सुरक्षा योजना व प्रधानमंत्री मातृ वंदन योजनेचा लाभ मिळालेला नाही
- आरोग्य उपकेंद्रावर लाईट नाही, रंगरंगोटी नाही, उपकेंद्रामध्ये येण्यासाठी असलेल्या रस्त्यावरील नालीवरची फरशी तुटलेली आहे.
- आरोग्य उपकेंद्र दररोज उघडे राहत नाही.
- प्रा.आ.केंद्राची निवासस्थाने नादुरुस्त आहेत.
- शिपायांची आणि औषध वितरकाची पदे रिक्त आहे.
- रुग्णवाहिका नेहमी बंद असते.
- एएनएम पद भरलेले आहे परंतु तिला इतर कामांच्या अतिरिक्त जबाबदारीमुळे हजर राहता येत नाही.
- वैद्यकीय अधिकारी उपकेंद्राला भेट देत नाहीत. त्यांची भेट कमीत कमी आठवड्यातून एकदा तरी व्हावी.
- उपकेंद्र बंद स्थितीत आहेत. तिथे घाणीचे साम्राज्य पसरले

ग्रामविकास विभाग

- गावातील गरजू व्यक्तींना घरकुल मिळावे.
- ग्रामसंघाच्या मासिक बैठकीला व साहित्य ठेवण्यासाठी, ग्राम पंचायतीने जागा उपलब्ध करून देणे.
- गावात कचराकुंड्या बसविल्या जाव्यात.
- गावातील अत्यावश्यक गरजू लाभार्थ्यांना शौचालय लाभ मिळालेला नाही.
- नियमाप्रमाणे शाळा, अंगणवाडी, आरोग्यावर १४व्या वित्त आयोगातून खर्च झालेला नाही.
- ग्रामसेवक ठरलेल्या वेळी येत नाही, ग्रामपंचायतीचे नियोजन नसल्यामुळे मागील चार वर्षाचा काही योजनेचा निधी शिल्लक दिसतो.
- गावात स्वच्छता मोहीम राबवण्याची गरज आहे.

आदिवासी विकास विभाग

- अमृत आहार योजने अंतर्गत मिळणाऱ्या रोजच्या आहारात डाळ किंवा भाजी पैकी फक्त एकच दिले जाते.
- अमृत आहार योजने अंतर्गत मिळणाऱ्या रोजच्या आहारात शेंगदाणा लाडू दिला जात नाही.
- पेसा अंतर्गत अमृत आहार योजनेचा आहार शिजविणाऱ्या बाईचे मानधन ६ महिन्यांपासून मिळाले नाही.
- मार्च - एप्रिल २०१९ मध्ये निधी अभावी अमृत आहार योजने अंतर्गत आहार बंद होता.
- अमृत आहार योजनेच्या समितीबद्दल लाभार्थी व समितीचे सदस्य यांना माहिती नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्था

- गावातील नागरिकांना रेशन दुकानातून वेळच्या वेळी रेशन मिळत नाही.
- विधवा महिलांना अन्त्योदय योजनेचा लाभ मिळवून देण्यात यावा.

सामाजिक न्याय विभाग

- श्रावणबाळ पेन्शन योजनेचा लाभ मिळत नाही.

सोशल ऑडिट प्रक्रिया सुरू असलेल्या तीस गावातून पुढे आलेल्या मुद्द्यांचे विश्लेषणातून, एकूण सात विभागांशी संबंधित गावस्तरावरील मुद्दे पुढे आले. त्यात प्रामुख्याने आरोग्य विभाग शिक्षण विभाग, एकात्मिक बाल विकास योजना आणि ग्राम विकास विभागातील सर्वाधिक मुद्दे होते. या मुद्यांचा पाठपुरावा गाव आणि तालुका स्तरापर्यंत केला जात असून बरेच मुद्दे सुटण्याच्या प्रक्रियेत आहेत. पण काही मुद्दे हे तालुका, जिल्हा स्तरावर तर काही राज्य स्तराशी निगडित आहेत, असेही या विश्लेषणातून दिसून येत आहे.

विभागानुसार आलेले स्थानिक व धोरणात्मक मुद्दे



विभागानुसार सुटलेले व न सुटलेले मुद्दे



पातळीनुसार मुद्द्यांचा पाठपुरावा



सोशल ऑडिटमुळे घडलेले सकारात्मक बदल

कर्मचारी नियमित येऊ लागलेत.

- अनेक गावांमध्ये कर्मचारी येत नाहीत अशी तक्रार होती. सोशल ऑडिटच्या प्रक्रियेतून झालेल्या वातावरण निर्मितीचा थेट आणि दृश्य परिणाम म्हणजे हे कर्मचारी नियमित येऊ लागले.
- पठाण मांडवा गावात कृषीसहाय्यक कधीच येत नसत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीच्या योजना वेळेवर समजायच्या नाहीत. जनसुनवाईच्या वेळी लोकांनी शेतीविषयी बरेच प्रश्न विचारले आणि कृषी सहाय्यकाने वेळेवर योजनांची माहिती द्यावी अशी मागणी केली. त्यानंतर कृषी सहाय्यक नियमितपणे गावभेट करू लागले.
- सुगावमध्ये उपकेंद्राची नवी सुसज्ज इमारत तयार आहे. निवासाची चांगली सोय असूनही नर्स तिथे राहत नव्हती. ग्रामपंचायतीने यापूर्वी वारंवार सांगूनही जो फरक पडला नव्हता, तो जनसुनवाईनंतर पडला. आणि नर्स उपकेंद्रामध्ये २४ तास उपलब्ध होऊ लागली.
- कुरखेड्यामधील गावे लहान व विखुरलेली आहेत. गट ग्रामपंचायतींची संख्या मोठी आहे. ग्रामसेवक कधीच भेट देत नाहीत ही इथल्या सर्वच गावकऱ्यांची तक्रार होती. सोशल ऑडिटच्या प्रक्रियेनंतर आता प्रत्येक गावात ग्रामसेवक आठवड्यातून निदान एकदा हजर असतात.

प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचून योजनेचा लाभ दिला जात असल्याने मागील वर्षीपेक्षा या वर्षी लाभार्थी संख्या वाढली असल्याचे मानवलोक संस्थेचे निरीक्षण आहे.

लाभ वितरणामध्ये सुसूत्रता येऊ लागली.

वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील बऱ्याच त्रुटी पडताळणी दरम्यान उघड झाल्या. विशेषतः मातृत्व वंदना योजनेमधील सर्व हप्त्यांचा लाभ न मिळणे किंवा अजिबात लाभ न मिळणे, अशा केसेस समोर आल्या. त्यांची जनसुनवाईत चर्चा झाल्यानंतर लाभ लगेच दिले जाऊ लागले.

लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवणारी गौडवाडी-

गौडवाडी गावात पडताळणी गट लाभार्थ्यांच्या घरी जाऊन मातृत्व वंदना योजनेची माहिती घेत असताना इतरांना कुतूहल वाटत होते. विषय समजल्यावर लोक आपणहून आसपासच्या नवप्रसूत महिलांची माहिती देत होते आणि त्यांना लाभ न मिळाल्याचे सांगत होते. लोक ज्या महिलांची नावे सांगत होते ती नावे यादीत नसल्याने गटाने काही महिलांना भेटायचे ठरवले. तर पात्र असलेल्या पण लाभ न मिळालेल्या अनेकजणी त्यांना भेटल्या.

गौडवाडी गावात दोन आशा आहेत आणि त्या दोन विशिष्ट भागांमध्ये काम करतात. त्याव्यतिरिक्त उरलेला भाग दुर्लक्षित राहतो. तिथल्या कुटुंबांना कुठल्याच योजनांची माहिती नसल्याचे व लाभ न मिळाल्याचे दिसून आले. पडताळणी गटाने २०१७ पासूनची माहिती घेतली तर मातृत्व वंदना योजनेचा लाभ न मिळालेल्या वा अपुरा लाभ मिळालेल्या ६७ जणी त्यांना आढळल्या. पडताळणी प्रक्रियेमुळे या मुद्द्याचा गावात चांगलाच गवगवा झाला. हळूहळू ज्यांचे एक-दोन हप्ते थकलेले होते त्यांचे पैसे येऊ लागले. तरीही जनसुनवाईमध्ये या मुद्द्याची जोरदार मांडणी झाली. अपुरा लाभ मिळालेल्या महिला आणि पात्र असूनही लाभ न मिळालेल्या महिला जनसुनवाईला हजर होत्या. सुनवाईनंतर या प्रश्नाची सोडवणूक व्हायला सुरुवात झाली आहे. ६७ पैकी ४७ जणांना सुनवाईनंतरच्या पुढील आठवड्यात लाभ मिळाला. इतर लाभार्थ्यांसाठी पाठपुरावा चालू आहे.

सोशल ऑडिटमुळे घडलेले सकारात्मक बदल

प्रशिक्षणाची मागणी व माहितीचा वापर वाढतो आहे.

कुरखेड्यातील गावांमध्ये पेसा कायदा लागू आहे. गावे लहान असून गटग्रामपंचायती आहेत. पण प्रत्येक गावच्या ग्रामसभेला निर्णयाचे अधिकार आहेत. गडचिरोलीतील कोरची तालुक्यातील जवळपास १०० ग्रामसभांनी एकत्र येऊन महाग्रामसभा तयार केली आहे. या संघटनेमुळे ग्रामसभांना पेसा आणि वनहक्काबाबतचे त्यांचे अधिकार वापरता येतात. आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेने कुरखेड्यातील गावगटांची अभ्यास सहल आयोजित करून त्यांना कोरची महाग्रामसभेची प्रक्रिया समजावून दिली. या माहितीमुळे आता तेही जागरूक होऊन आपल्या अधिकारांचा वापर करू लागले आहेत. येडापूर आणि आंधळी या गावांच्या हद्दीतील जंगलातून विजेचे खांब उभारण्याचे काम कलेक्टरच्या परवानगीने सुरू झाले. पण या कामासाठी संबंधित ग्रामसभांची परवानगी घेतलेली नव्हती. झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी या दोन ग्रामसभांनी आपली मागणी संबंधित विभागाला सादर केली आहे.

देखरेखीचे महत्त्व गावगटांना पटू लागले.

अंबेजोगाई तालुक्यातील सुगावमधील जुने वृक्ष तोडण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने परस्पर घेतला. तो समजल्यावर गावगटाने आक्षेप घेतला, ग्रामपंचायतीला लेखी पत्र दिले आणि कारण विचारले. त्यानंतर ग्रामपंचायतीने वृक्ष तोडण्याचा निर्णय मागे घेतला.

सांगोल्यातील जनसुनवाईनंतर काही गावातील शालेय व्यवस्थापन समित्यांनी आपणहून प्रशिक्षणाची मागणी केली आहे.

लोकमत समाचार

जागरूकता ● जनसंवाद कार्यक्रम में अनिकेत लोहिया ने दी आवश्यक जानकारी

भ्रष्टाचार पर नियंत्रण के लिए ऑडिट होना जरूरी

वाढोणा गावात पहिल्यांदाच पोहोचली महामंडळाची बस

विद्यार्थ्यांसाठी सोय । गावकऱ्यांकडून जल्लोषात स्वागत

पुलाअभावी १० किमीचा फेरा

विविध मागण्यांसाठी अस्तित्व सामाजिक संस्थेच्या वतीने निवेदन सादर

सांगोला/प्रतिनिधी:

१२ गावांमध्ये सामाजिक ऑडिट

मानवलोकचा पुढाकार : शासकीय योजनांबाबत जनजागृती

अंबाजोगाई / प्रतिनिधी : शासकीय योजनांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी तसेच जनजागृती करण्याच्या उद्देशाने 'मानवलोक'च्या वतीने पुढाकार घेण्यात

सार्वजनिक सेवा-सुविधा आणि योजनांचे सामाजिक अंकेक्षण (ऑडिट) साहारे केले जाणार आहे. यांतर्गत सर्वप्रथम गावपातळीवर ८ ते १० व्यक्तींचा ग्रुप

यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे.

याकामी समन्वयक सतीश कांबळे माणिक कुकडे, गोरक्ष जाधव हे सहकार्य करत आहेत.

निष्कर्ष व पुढील दिशा

- 'सार्वजनिक सेवांचे सोशल ऑडिट' हे सरकारी सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीचे आणि लोकांपर्यंत अपेक्षित लाभ पोहोचवण्याचे उपयुक्त साधन असल्याचे अनुभवातून दिसून येत आहे. सोशल ऑडिटच्या माध्यमातून लोकांच्या जगण्याशी संबंधित प्रश्नांची उकल आणि ते सोडवण्याचे ठोस प्रयत्न होऊ शकतो हा विश्वास या प्रक्रियेतून मिळाला.

- सोशल ऑडिटसारख्या लोकाधारित देखरेख प्रक्रियेला शासनाच्या पातळीवर अधिकृत मान्यता असेल तर ही प्रक्रिया अधिक सुलभ होते. संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग तसेच लोकांचे प्रश्न सुटायला आणखी बळ मिळते असे लक्षात आले.

- सोशल ऑडिटसारख्या प्रक्रियांमधून लोकांचे प्रश्न सुटण्यास मदत होतेच. पण त्यापुढे जाऊन सरकारी कर्मचारी-अधिकारी यांना सरकार दरबारी प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होते, असे विविध पातळीवरील अधिकारी-कर्मचारी यांनी सांगितले.

- गावगटांनी सोशल ऑडिटमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावली आणि त्यांना सहाय्य करण्याचे काम सामाजिक संस्थांनी केले. सरकारी यंत्रणा व लोकांमधील दुवा म्हणून सामाजिक संस्थांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. सोशल ऑडिट प्रक्रिया खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि स्वायत्त पद्धतीने राबवायची असेल तर त्यामध्ये हक्काच्या भूमिकेतून काम करणाऱ्या स्थानिक संस्था-संघटना यांचा सहभाग होणे खूप आवश्यक आहे.

- म्हणून सामाजिक संस्था-संघटना यांच्या पुढाकाराने राबवलेल्या सोशल ऑडिट अनेक मागण्या/सूचना सातत्याने पुढे येत आहे. अशा प्रक्रिया पुढे देखील केल्या जातील. तरी राज्यात सध्या कार्यरत असलेल्या 'सोशल ऑडिट युनिट' (SA Unit) आणि 'राज्य नियंत्रक व महालेखा परीक्षक' (State CAG) या शासकीय यंत्रणांनी या सगळ्या प्रक्रियांची दखल घेणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे सोशल ऑडिटसारख्या प्रक्रियांची व्याप्ती वाढण्यास मदत होईलच शिवाय संस्था-संघटनांच्या कामाला सरकार दरबारी मान्यता मिळेल.

- मेघालयमध्ये सोशल ऑडिट प्रक्रियेला कायद्याचे पाठबळ मिळून या प्रक्रियेला सरकार दरबारी रीतसर मान्यता प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र सरकारने अशाप्रकारे पुढाकार घेणे गरजेचे आहे. याची सुरुवात म्हणून टप्याटप्याने सर्व सरकारी विभागांच्या यंत्रणेत सोशल ऑडिटचा समावेश करायला हवा. त्यासाठी स्वतंत्र व स्वायत्त यंत्रणा उभी करून निधीची तरतूद करायला हवी.

सोशल ऑडिट प्रक्रियेत सहभागी संस्थांविषयी...

आम्ही आमच्या आरोग्यासाठी कुरखेडा, गडचिरोली

- 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' ही संस्था गडचिरोली व विदर्भातील अन्य जिल्ह्यात मागील तीन दशकांपासून काम करत आहे. आदिवासी व महिला सक्षमीकरणाच्या भूमिकेतून आरोग्य, शेती, पर्यावरण, अपंग हक्क अशा विविध विषयांवर संस्थेने पायाभूत काम उभे केले आहे. संस्था विविध राष्ट्रीय नेटवर्कमध्ये सहभागी आहे.
- हा भाग आदिवासीबहुल असल्याने पेसा व वनहक्क कायद्यांची अंमलबजावणी यांना प्राथमिकता देऊन संस्था स्थानिक समूहांना आपले हक्क मिळवण्याच्या प्रक्रियेत सक्षम करत आहे.

मानवलोक, अंबेजोगाई, बीड

- 'मानवलोक' संस्था अंब्बेजोगाईमध्ये मागील तीन दशकांपासून काम करत असून संस्थेने गावागावात स्वयंसेवी कार्यकर्ते निर्माण करून बहुसंख्य गावांमध्ये संपर्क प्रस्थापित केले आहेत. हा भाग दुष्काळी असल्याने गावांमध्ये लोकसहभागातून अनेक प्रकारची कामे करण्याबरोबरच मानवलोककडे सरकारी यंत्रणेशीही समन्वय राखून प्रशासकीय स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कौशल्यही आहे.
- शेती, पाणी, महिला अधिकार, आरोग्य या विषयांना प्राधान्य देऊन संस्थेचे काम चालू आहे.

अस्तित्व, सांगोला, सोलापूर

- 'अस्तित्व' संस्था सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात मागील पंधरा वर्षांपासून काम करत आहे. हा भाग दुष्काळी असल्याने हंगामी स्थलांतराचे प्रमाण मोठे आहे. रोजगार, पाणी, शेती या समस्यांच्या सोडवणुकीसाठी पर्यायी मार्गांचा शोध घेण्याचे काम संस्था करत आहे.
- महिला, युवक-युवतींचे व वंचित घटकांचे संघटन, प्रबोधन, प्रशिक्षण यावर संस्थेच्या कामाचा भर आहे.

साथी, पुणे

- साथी टीमची सुरुवात १९९८ मध्ये सेहत संस्थेचा एक भाग म्हणून झाली, त्यानंतर २००५ पासून 'साथी' स्वतंत्रपणे काम करू लागली. साथी मुख्यतः आरोग्य हक्कावर आणि सार्वजनिक आरोग्य सेवा सक्षम करण्याच्या भूमिकेतून ॲडव्होकसीचे काम करत आहे. साथी संस्था विविध स्वयंसेवी संस्थांसोबत संस्था व लोकांचे सक्षमीकरण, संशोधने, प्रशिक्षण, माहिती साहित्य तयार करण्याचे काम करत आहे.
- आरोग्य सेवांच्या लोकाधारित देखरेख व नियोजनात राज्य समन्वयक संस्था म्हणून 'साथी' स्थानिक समन्वयक संस्थांना प्रशिक्षण व सहाय्य देण्याबरोबरच विविध विषयांवरील माहिती साहित्य, अभ्यास, अहवाल प्रकाशित करण्याचे काम करत आहे.

Support for Advocacy and Training to Health Initiatives
साथी

Published by:
SATHI (Support for Advocacy and Training to Health Initiatives)
Flat No. 3 & 4, Aman (E) Terrace Society, Dahanukar Colony, Kothrud, Pune- 411038
Phone- 020-25472325, 25473565
Email- sathicehat@gmail.com, Website- www.sathicehat.org
Printed by : Imagine Graphics
February, 2020